
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची काव्यप्रेरणा व काव्यदृष्टी

आचार्य कोमल वि. ठाकरे
सहयोगी प्राध्यापक,तायवाडे महाविद्यालय,कोराडी.

**प्रस्तावना :–**




राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे आधुनिक संतपरंपरेतील एक महत्वाचे संत आहेत. 59 वर्षाच्या आपल्या जीवनकाळात त्यांनी आपली नाममुद्रा भारतीय जनमनावर खोल कोरली. बालपणापासून कुाग्र बुद्धीचा असणारा माणिक पुढे तुकड्या नंतर तुकडोजी, नंतर महाराज व अखेरीस राष्ट्रसंत झाला. व्यक्तिविकासाची ही मळवाट आपल्या मध्ययुगीन थोर संतांनीच निर्माण केली होती. राष्टसंतांचा मूळ पिंड हा कवीचाच होता. या कवीत भक्तीची ऊर्मी दाटली होती. एक अनावर नादिष्टपणा त्यांच्यात होता. आपल्या भावनेचा पहिला उत्कट आविष्कार त्यांनी काव्यामधूनच साधला. हा आविष्कार साधत असताना त्यांच्यासमोर प्राचीन–अर्वाचीन काव्याची प्रदीर्घ परंपरा होती; तथापि अगदी सुरुवातीपासूनच आपल्या पृथगात्मतेचे त्यांना भान होते. परंपरेतून काय शोषावयाचे व आपल्या आंतरिक ऊर्मीनांही कसे प्रकट करायचे याचा समन्वय त्यांनी आपल्या काव्यलेखनात साधला. संतांच्या ओवी, अभंग, भजनांतून त्यांची रचना प्राचीन काव्यपरंपरे आपले नाते सांगत आहे. अर्वाचीन मूल्यनिष्ठेशी त्यांचे नाते आहे.

संतांच्या काव्यातील भक्तिभावनेचा, विठ्ठलप्रेमाचा रस शोषून घेऊन आधुनिक काळातील नव्या संवेदनशीलतेचा राष्ट्रीय, सामाजिक मूल्यजाणिवांचा राष्ट्रसंतांनी सांधा जुळवून, परंपरा आणि नवतेचा समन्वय साधून अभंग, ओवी, भजन स्वरूपाची कविता लिहिली. विवेकाच्या बैठकीवर जुन्या–नव्या श्रद्धांचा समन्वय साधून अध्यात्म आणि व्यवहाराचे सुंदर मीलन घडविले. आपली वाणी, लेखणी, शक्ती आणि भक्ती याचे संपूर्ण सामर्थ्य एकवटून समाजजागृतीचे, परिवर्तनाचे आणि प्रगतीचे उन्नयन केले. परंपराप्रिय भारताला खरा देवधर्म आणि देशधर्म दाखविण्याचे कार्य त्यांच्या काव्यातून झाले.

## राष्ट्रसंतांवरील आध्यात्मिक संस्काराचे स्वरूप

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांवर बालपणापासूनच आध्यात्मिक काव्याचे संस्कार आहेत. भारतीय भक्तिआंदोलनाचा प्रभाव आहे. ते विदर्भातील अमरावती जिल्हयातील यावली या गावाला 30 एप्रिल 1909 ला बंडोजी ब्रम्हभट्टाच्या घरी, माता मंजुळेच्या पोटी जन्माला आले. त्यांच्या घराण्यात पंढरीची वारी होती. श्री विठ्ठल हे त्यांचे आराध्य दैवत होते. आडकुजी महाराजांच्या सहवासात त्यांचे बालपण गेलेले होते. तत्कालीन विदर्भातील अवलीया संतांचा सहवास राष्ट्रसंतांना लाभला. अनेक कीर्तनकारांचे खंजिरीवादन त्यांनी ऐकले होते. हनोतीबुवाकडून एकतारीचे पाठ घेतले होते. पुरातन मठात जाऊन दगडांचे टाळ हातात घेऊन भजन करणारा माणिक बालपणापासूनच अध्यात्मरंगात रंगला होता. ध्यानस्थ बसला होता. त्याचे बालरूप अनन्यभक्तीत दंग होते. शाळेत फावल्या वेळात तो प्रवचनासारखेच बोलत होता. वरखेडला त्याच्या मामाकडे राहायला गेल्यानंतर ग्रंथवाचनात रमला. "वरखेडक्षेत्रीच माणिकदेवानं गोस्वामी तुलसीदासाचे रामायण, भगवान श्रीकृष्णाची व्यासकृत

भगवद्गीता, समर्थ रामदासस्वामीचा दासबोध अन् संत तुकारामांची गाथा वाचली होती. संत कबीर भक्तिमती मीराबाईची भक्तीगीते इथेच थोडी फार अभ्यासली होती."[1] त्यांना तुकारामांचे अभंग आवडायचे. ते अभंग त्यांना मुखोद्गद होते. एका क्षणी स्वतःची रचना जेव्हा माणिक 'तुक्या म्हणे' असे म्हणून म्हणायला लागला, तेव्हा आडकोजी महाराजांनी त्यांना अरे तुक्या तुक्या काय म्हणतं, तुकड्या म्हणत जाय. कारण आडकोजी महाराज माणिकला तुकडया म्हणायचे. तेव्हापासून 'तुकड्या म्हणे' या नाममुद्रेसह माणिकचे काव्य जन्माला आले. तेव्हापासून ते तुकडोजी म्हणून ओळखल्या जाऊ लागले. त्यांनी आपल्या गीत, अभंग, भजनरचनेतच नव्हे तर ग्रामगीतेपर्यंतच्या सर्व रचनेत 'तुकड्या', 'तुकड्यादास' ही नाममुद्रा वापरली. तुकडोजींच्या अभंगरचनेमागे त्यांच्या या जीवनप्रवासाचा संदर्भ आहे.

त्यांना बालपणापासून वाचनाचा छंद असल्यामुळे आध्यात्मिक ग्रंथवाचनाचा संस्कार त्यांच्यावर झाला. गुरूदेव मासिकामध्ये त्यांनी म्हटले आहे की, "संत तुकाराम, एकनाथ, रामदास, तुलसीदास, कबीर, मीरा, ब्रम्हानंद आदिके भजनभावसे और दासबोध परमामृत, विवेक चुडामणी, भगवद्गीता आदिग्रंथो के कुछ उपदेश पढणे सुननेसे मुझपर बहुतही गहरा प्रभाव पडा."[2]

## राष्ट्रसंतांवरील प्राचीन काव्यप्रेरणांचे स्वरूप

राष्ट्रसंत हे एक प्रतिभावंत संतकवी होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात संतत्त्वाचा आणि कवित्त्वाचा सुरेख समन्वय साधला होता. वयाच्या आठव्या वर्षापासूनच त्यांनी आपल्या काव्यलेखनाला सुरूवात केली. त्यांच्या काव्यप्रतिभेतून मराठीत 1260 भजने, 2109 अभंग, 5149 ओव्या, 376 श्लोक, 10 पोवाडे, 13 आरत्या, 16 मंगलाष्टके, 32 श्रीगुरूमहिमामृत ओळी आणि 1517 सुविचार जन्माला आले. हिंदी भाषेत 2369 भजने, 1746 बरखा आणि 8 प्रार्थनाश्लोक इतके प्रचंड साहित्य जन्माला घालणाऱ्या राष्ट्रसंतावर प्राचीन संतवाणीचा प्रभाव होता. अनुभवसागरमध्ये ते लिहितात.

*करूनि कृपा श्री ज्ञानदेव बोलिले ग्रंथीच्या खुणा।।*
*जयाने तुटती जीव यातना*
*सुलभ व्हावया मार्ग तुकोबा अभंग वदती जना।।*
*अभंगी लागे मन वासना।।*
*एकनाथ एक नाथ अमुचा उदार होऊनि मना।*
*प्रगटवी गुप्त गुह्य भावना।।*

या आपल्या सृजनशील जाणिवांना उत्कटपणे त्यांनी प्रकट केले. हे सर्व वाचत असताना वाचकांनी आपली बुद्धी गहाण ठेवू नये, असा हितोपदेशही त्यांनी केला. ग्रंथ वाचताना तारतम्य ठेवावे व कोणत्या ग्रंथातून काय घ्यावे याचे भान त्यांना होते. 'विष्णुमय जग' हाच स्वधर्म। ऐसे संती कथीले वर्म।। तरीही आमुचा न जाय भेदभ्रम। अमंगळ ऐसा।। असे आपल्या बुद्धिचातुर्याने श्रोत्यांच्या शंकांचे निरसन करून गीतावचनाचा अनुवाद त्यांनी केला. गीतेतील 'स्वधर्म' आणि 'सर्वधर्मसमन्वय' या दोन्ही संज्ञांचा खल करून त्याचा नेमका अर्थ सुस्पष्ट केला. संत ज्ञानेश्वरांप्रमाणेच ग्रामगीता या आपल्या ग्रंथाच्या उपयोजनाचे उद्दिश्ट त्यांनी प्रकट केले. '*सर्वांभूती भगवद्भाव। हा संतश्रेष्ठाचा अनुभव।। त्या तत्त्वाचीच उठाठेव। या ग्रामगीतेमाजी।। गीतेचे विश्वरूपदर्शन। वेदाचे विराट पुरूष वर्णन।। संतांच्या विश्वात्मक देवाची खूण। लाभे येथे सक्रीय।। सर्व उपनिषदादी गायी। दोहूनी केली गीतामाई। तैसेचि संतग्रंथ सर्वही। साररूपे या ग्रंथी।।* असे ग्रामगीतेचे आपल्या परंपरांशी असणारे नाते त्यांनी स्पष्ट केले. यावरूनच राष्ट्रसंतावर संतांच्या खोलवर रुजलेल्या संस्काराचे स्वरूप लक्षात येते. ग्रामगीतेत 145 संत–महंतांची झालेली नोंद, संतचरित्रांतील अनेक पैलूंना त्यांनी केलेला स्पर्श यावरून प्राचीन कवींच्या, वेद–उपनिषदांच्या, गीतेच्या झालेल्या संस्कारांतून त्याचा आत्मविकास कसा बहरत गेला हे लक्षात येते.

## राष्ट्रसंतांच्या काव्यनिर्मितीमागील पृथगात्म भक्तीसाधना

राष्ट्रसंतानी बुडणाऱ्या जनांकडे पाहून कळवळणारी आध्यात्मिक अनुभूती स्वीकारली. कीर्तन – प्रवचनातून ऐकलेले संतांचे अभंग यातून आध्यात्मिक मूल्ये त्यांच्या रक्तात भिनली असल्याने त्यांनी अध्यात्मप्रधान कविता

लिहिली. राष्ट्रसंत सश्रद्ध कवी आहेत. विठ्ठलप्रेम, अभंग, ओवी छंद त्यांची अध्यात्मनिष्ठा, त्यांची विश्वकरुणा, त्यांचे एकूणच निरलस, निरपेक्ष, निस्वार्थी, जनकल्याणार्थ झटणारे, राष्ट्रप्रेमाने प्रभावित असलेले व्रतस्थ, सेवाव्रती, बहुआयामी व्यक्तिमत्व, त्यांनी स्वीकारलेली जीवनमूल्ये हे सर्व संतकाव्याप्रमाणे वाटते. संत तुकारामांच्या अभंगवाणीचा संस्कार त्यांच्या काव्यावर जाणवतो, संत तुकारामांच्या जीवनविषयक आशयाची एकरूपताही त्यांच्या कवितेत जाणवते. पाखंडखंडणाचा तोच आवेग प्रगट होताना दिसतो. पण स्वतःच्या भक्तिभावाचे फार मोठे वलय त्यांच्या अभंगातून प्रकटले आहे. आत्मविकासाचा प्रवास कसा झाला त्याचे अनुभव उत्कटपणे त्यांच्या अभंगातून व पदांतून प्रकट झालेले आहे. त्यातून ईश्वरभक्तीची आर्तता, भावभक्तीची उत्कृष्टता, साधकाची नम्रता प्रकटली आहे. सद्भक्तीची लक्षणे, सत्संगाचे महत्त्व, प्रकट करणारे अभंग लिहिणाऱ्या राष्ट्रसंतांचा आत्मोन्नती ते विश्वोन्नती असा विकासात्मक प्रवास दिसून येतो.

राष्ट्रसंतांची भक्तिसाधना इतर संतकवींपेक्षा वेगळी आहे. संत तुकारामाची ज्याप्रमाणे संसार, त्यातील दुःख, मग प्रपंचातून विरक्ती नंतर ईश्वरप्राप्तीची आस, आत्म्याची काळोखी रात्र, भिंगुळवाणी अवस्था आणि पुढे केवलानंदाच्या ऊर्मी दाटून आलेला आत्मसाक्षात्काराचा प्रकाश अशी आत्मविकासाची भक्तीमय रूढ वाट होती तशी राष्ट्रसंतांची नव्हती. त्यांनी लग्न न केल्यामुळे संसाराचा प्रश्नच नव्हता. राष्ट्रसंतांच्या भक्तीची नाळ सुरूवातीपासूनच भोवतालच्या समाजवास्तवाला जोडली होती. देव, भक्ती, समाजातील अज्ञान, दारिद्रय, विषमता यांनी भरलेल्या वास्तवाविषयीचे अनेक प्रश्न तुकडोजी महाराजांच्या मनात होते. 14व्या वर्षी ते रामटेकच्या जंगलात गेले. चंद्रपूरच्या जंगलात जाऊन आदिवासींच्या दैन्य–दुःखाने त्यांचे मन व्यथित झाले. आदिवासींचे अज्ञान हालअपेष्टा पाहिल्यावर मूर्तिपूजेचे फोलपणही त्यांच्या लक्षात आले. दुःखितांचे दुःख नाहिसे करणे हीच ईश्वरपूजा होय. देव दगडात नसून दारिद्र्याने गांजलेल्या माणसाच्या ठायी वास करतो अशी त्यांची मनोधारणा झाली. मुठित नाक धरणाऱ्या हटयोगापेक्षा आणि जपमाळ जपणाऱ्या कर्मकांडापेक्षा ही भक्ती समाजाधिष्ठित होती. त्यांनी कधी स्वतःला मंदिरात कोंडून घेतले नाही. जन हाच त्यांचा देव आणि समाज हेच त्यांचे मंदिर होते. जगाच्या विशालतेत विलीन होण्यासाठी जे विश्वाचे आर्त मनात प्रकाशित व्हायला हवेत, जी विश्वकरुणा मनात भरून असायला हवी ती महाराजांच्या हृदयात भरभरून आहे याची त्यांना जाणीव होती. त्या करुणामयतेतूनच हे विश्वचिंतन निर्माण झाले होते. "कर्दमात रुतत चाललेला सभोवतालच्या अज्ञ बहुजन समाजापासून अत्यंत प्रगत, पण कधीकधी युद्धखोर बनणाऱ्या विश्वसमाजापर्यंत विचार करणारी त्यांच्या जाणिवेची कक्षा अतिशय व्यापक होती."[3]

महाराजांच्या मनातील अस्वस्थता, अशांती ही विश्वकरुणेचाच भाग होती. 'विश्वाचे आर्त माझ्या मनी प्रकाशले' असे म्हणणाऱ्या ज्ञानेश्वरांप्रमाणेच किंवा 'सुखीया सब संसार है खाये और सोये। दुखिया दास कबीर है रोये और गाये' या कबीराच्या रडणाऱ्या आणि गाणाऱ्या अंतःकरणाप्रमाणे महाराजांच्या मनात अशांती होती. त्यांच्या कवित्त्वापेक्षा आणि संतत्त्वापेक्षा करुणेची महती अधिक होती. 'मज माणूस द्या' ही आर्त हाक त्यांच्या जगण्याचा अर्थ सांगणारी आहे. त्यांच्या काव्यनिर्मितीमागे, साहित्यनिर्मितीमागे ही अशांतीच होती. महाराज सांगतात,

*मै कवि नही करूणा हूँ मै, उन दुखियों की दीन की।*
*मै साधून नही साधना हूँ, प्रेम की सत् नेमकी।।*
*ना शान्ति है मुझमे, हूँ मै पिछडे जनो की भावना।*
*इन्सान बनने जो चले, मै उनकी हूँ शुभकामना।।*

राष्ट्रसंतामध्ये अषाप्रकारे एक विलक्षण सर्जनशील अशांती होती. आत्मसन्मुख होऊन त्यांनी आपल्या अंतःकरणाला बघितले होते. ज्यात त्यांच्या प्रकशमय अशा आत्मस्वरूपाचे स्वच्छ दर्शन घडले. तोच विश्वार्ततेने प्रकटलेला प्रकाश विश्वावर पडून महाराजांना विश्वस्वरूप दिसले. अशा आत्ममग्न भाववृत्तीतूनच त्यांच्या अभंगाची निर्मिती झाली. महाराजांच्या अंतःकरणातले सगळे हार्द त्यांच्या हिंदी–मराठी रचनांमधून सहजस्फूर्तपणे समरसून प्रकट झाले आहेत. महाराजांच्या काव्यप्रतिभचे तरल आणि भक्तीभावस्पर्शी उन्मेष त्यांच्या अभंगांतून प्रकटले आहेत. मागे राहिलेल्या, दुःखीजनांचे दुःख त्यांच्याकडून पाहवत नाही. महाराज भक्तीभावाच्या लीन अवस्थेत अडकून पडत नाहीत. विश्वकरुणा ही त्यांच्या व्यक्तित्वाचा अविभाज्य भाग आहेच पण सभोवतालचा समाज, ज्या ग्रामभूमीतून ते उदयाला आले ती भूमी तिची दयनीय अवस्था, लोकांचे अज्ञान, पारंपरिक रूढी, बुरसटलेली मने हे

सर्व त्यांच्या ध्यासाचा विषय झाले. सुरुवातीपासून महाराजांच्या अभंगांत देशस्थितीची चिंता होतीच. राष्ट्राचा अभ्युदय करण्यासाठी जागरूक असलेल्या चिंतेला आधुनिक विचाराची जोड आहे. समाज दुर्बल, प्रवाहपतीत राहू नये, तो सबल, ध्येयपूर्ण, स्वतंत्र असावा यासाठी त्यांचे मन तळमळत होते. माणूस अंतर्बाह्य बदलविणे, त्याला जागवणे हे त्यांचे ध्येय बनले होते. त्यासाठी त्यांनी समाजसेवा, समाजसुधारणा असे शब्द वापरले नाहीत. पण अंतःसूत्र तेच होते. खंजिरीच्या तालावर होणाऱ्या आवाहक भजनांतून, कवितांतून पदांतून त्यांनी सामान्य माणसाच्या हृदयाला हात घातला. त्याची मनोभूमी नांगरून त्यात मानवतावादाचे बिजारोपण केले, माणूस जागवला, त्याचा आत्मविश्वास वाढवून कर्तृत्वाची दिशा दाखविली. अशी महाराजांची भक्ती समाजनिष्ठ वास्तवावर आधारलेली, कृतीशील अशा नवसमाजाचे निर्माण करणारी आहे.

1935च्या सालबर्डी यज्ञातून त्यांनी आपल्या संघटनशक्तीचा प्रत्यय दिला. आपल्या कार्याची दिशा जाणीवपूर्वक बदलविली. यज्ञधर्माकडून ते राष्ट्रधर्माकडे, देवभक्तीकडून देशभक्तीकडे वळले. ते म्हणतात *'मैनेहि अपनी भावभक्ति को सरल मुडवा लिया। और देशभक्ती – राष्ट्रसेवा को ही प्रभू सेवा किया।'* आपल्या भक्तीभावाकडून देशभक्तीकडे वळणाऱ्या राष्ट्रसंतांनी महात्मा गांधीजींच्या सहवासात राष्ट्रीय चळवळीत भाग घेतला. देशाचे पारतंत्र्य झुगारून देण्यासाठी लोकांमध्ये राष्ट्रधर्माची जागृती करणे, त्यांच्या ठायी स्वातंत्र्यप्राप्तीची भावना चेतविणे आणि स्वराज्य मिळाल्यांनतर ते समर्थपणे सांभाळणारा सुयोग्य 'माणूस' घडविणे ही त्यांची भूमिका होती. त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होऊन कारावासही भोगला होता. त्यांच्या खंजिरी भजनाने राष्ट्रीय भावना चेतविणारे सकारात्मक वातावरण तयार झाले. त्यामुळे इंग्रजांनाही धडकी भरली होती. त्यांनी हैद्राबाद संस्थानात त्रासलेल्या लोकांना दिलासा देण्याचे कार्य केले. रझाकारांच्या प्रतिकारासाठी व्यायामवर्ग घेतले, शांतता प्रस्थापित करण्यासाठी बिहारमध्ये दौरा केला. पाकिस्तान युद्धाच्या वेळी भारतीय तरुणांना सैन्यात सामील होण्याचे आवाहन केले. चीनच्या सरहद्दीवर जाऊन भारतीय सैन्याला प्रेरक बळ पुरविले. सामाजिक विषमता नष्ट व्हावी म्हणून विनाबोंना अकरा दिवसात 11410 एकर जमिन मिळवून दिली. अशा अनेक राष्ट्रीय,सामाजिक कार्यांतून त्यांची कविताही त्याच प्रभावात बहरत गेली. *'हिंद प्रभुच्या लेकरांनो' स्वस्थ का बसला असे? भारताचे ग्रहण हे, नेत्री तुम्हा बघवे कसे?'* अशा काव्याने त्यांनी तरुण मने पेटविली होती. आपल्या ओजस्वी गीतांनी लोकमन चेतविले होते. *'कधी यैशल मनमोहना, पाहण्या भारत अपुला पुन्हा', 'भारता ग्रहण लागले आणि गुलामजन जाहले'* अशा राष्ट्रीय सामाजिक विचाराला अनुरूप असणाऱ्या त्यांच्या भजनांनी, कवितांनी लोकजागृती केली. एकूणच राष्ट्राच्या अभ्युदयासाठी प्रकटलेल्या चिंतेला व चिंतनाला आधुनिक विचारचिंतनाची जोड लाभलेली आहे.

महाराजांच्या विश्वव्यापक चिरंतन चिंतनतत्वाच्या पुरस्कारामुळे त्यांची प्रतिभा कोणत्याही विशिष्ट पंथ, संप्रदाय, धर्म, जात, देश, भाषा याच्या सीमारेषेत अडकून पडत नाही. त्यांनी स्वतःचा असा एखादा पंथ किंवा पक्ष निर्माण केला नाही किंवा कुठल्याही धर्म पंथ पक्षाला पाठिंबाही दर्शविला नाही म्हणूनच राष्ट्रसंत हे संप्रदायातीत, पंथातीत, पक्षविरहित असे विश्वकरुणेने भारावलेले व्यक्तिमत्त्व होते.

### राष्ट्रसंतांचा साहित्यविषयक व काव्यविषयक दृष्टिकोण :–

महाराज बालवयापासूनच झोपडीमध्ये पोत्यावर बसून जुन्या कागदावर काव्य लिहित असत. काव्यामुळे मनाला एकाग्रता लाभते. या विश्वासापोटीच त्यांनी *'एकाग्र साधन दिसे मज याने । म्हणोनि कवन आरंभिले'* असे म्हटले. राष्ट्रसंतांना बालपणापासून अंताक्षरी खेळण्याचा नाद होता. त्यावेळी त्यांना अनेक कविता, श्लोक, अभंग, भजनाच्या ओळी पाठ होत्या. त्यांची स्मरणशक्ती दांडगी होती. शीघ्रकवित्वाची निसर्गदत्त देणगीच त्यांना लाभली होती. पंढरपूरच्या चातुर्मासात एका दिवसातील काही वेळातच 24 अभंग महाराजांनी लिहिले. 33 श्लोकांचे पांडुरंग स्तोत्र एका बैठकीत लिहिले. 1939 साली 15 दिवसात कोठेही न अडखळता, खोडतोड न करता फावल्या वेळात अमरावती येथील मुक्कामात 500 अभंग लिहून काढले.चार दिवसात 'आदेश रचना' 379 श्लोक, आणि एका वर्षात ग्रामगीता लिहून पूर्ण केली. चार वर्ग शिकलेल्या महाराजांनी वेगवेगळ्याा वृत्तात, रचनांप्रकारात केलेले काव्यलेखन त्यांच्यातील जन्मजात काव्यप्रतिभेचे, संतत्वाचे, प्रत्यय देणारे आहे.

एवढे साहित्य निर्माण केल्यानंतरही काही साहित्यिकांनी महाराजांच्या साहित्यसेवेबद्दल शंका व्यक्त केल्यात,आरोप केलेत त्यावर त्यांनी मोजक्या शब्दांत प्रतिक्रिया दिली.

*मेरे उपर आरोप है, मै काव्य नहि हूँ जनता।*
*मुझको बडी इसकी खुशी, चाहे न कोई मान्यता*
*पर लोग तो सब समझते है, मै जहाँ गाने लगूँ।*
*लाखो किताबे जा चुकीं, यहि प्रेम मै पाने लगूँ'*

आजपर्यंत हजारो लाखो लोकांनी महाराजांच्या साहित्यसंपदेला आपल्या जगण्याचा श्वास केला आहे.

महाराजांची साहित्यकला केवळ कलेसाठी नसून ती मानवी जीवनासाठी आहे. त्यांच्या साहित्यात आध्यात्मिक, धार्मिक जाणिवांबरोबरच सामाजिक व राष्ट्रीय जाणिंवा आहेत. त्यांच्या साहित्यात समाजविचार दर्शन आहे. राष्ट्रचिंतन आहे. आत्मचिंतनापासून विश्वचिंतनापर्यंतचा प्रवास आहे. त्यांचे साहित्य परिवर्तनाची दिशादिग्दर्शन करणारे आहे. कर्मकांडविरहित माणूस निर्माण करणारे आहे. माणसातला देवा–धर्माबद्दलचा पारंपरिक भोळा दृष्टिकोन बाजूला सारून एक नवा डोळस, वैज्ञानिक, दृष्टिकोन त्यांनी विकसित केलेला आहे. राष्ट्रजागृतीचे मर्म सांगणारे त्यांचे साहित्य आहे. त्यांच्या साहित्यविषयक कल्पना स्पष्ट आहेत. त्याचे प्रयोजन सहज आकलनीय आहे. तुमसर येथील विदर्भ साहित्य संमेलनाच्या उद्‌घाटनप्रसंगी 1956ला त्यांनी स्पष्ट म्हटले की, 'मी साहित्य पुस्तकातून शिकलो नाही; अफाट जनसागरातून, हृदयाच्या गाभाऱ्यातून, आंतरिक उचंबळीतून मी साहित्य शिकलो. साहित्याची कल्पना ह्याा जनसागरात मिळाली."[4] यावरून त्यांच्या साहित्यप्रेरणेचे बीज हे जनकळवळ्याच्या मुळाशी असल्याचे लक्षात येते. 'बुडते हे जन देखवे न डोळा' या तुकारामांच्या साहित्यप्रेरणेच्या मुळाशी जे तत्त्व आहे तेच राष्ट्रसंतांच्या लेखनाच्या मुळाशी असल्याचे लक्षात येते.

महाराजांच्या या एकूणच लेखनामागे एक आगळीवेगळी साहित्यदृष्टी आहे. त्यांना साहित्यप्रेरणा जनसागरातून मिळाली आहे. 'माणूस द्या मज' असे म्हणत त्यांनी माणूस वाचला. त्या माणसाची अभावग्रस्तता सुविधा, आंतरिक ऊर्मी, बाह्या दडपणे, सुख–दुख, आशा–निराशा, क्षमता अगतिकता, स्वातंत्र्य बंधने, प्रेम–द्वेश, स्वप्न – वास्तव, अहंकार लीनता, दंभ शुचिता, भय– मोह अशा सर्व परस्परविरोधी व्यामिश्र भावभावनांच्या संघर्षाचे स्वरूप त्यांना कळले होते. त्या अनुभवातून त्यांच्या अंतरंगात मानवी सद्‌भाव प्रकट झाला. मानवी कल्याणाच्या उत्कट आस्थेपोटी त्यांच्या हृदयातून सहजस्फूर्त अशी शब्दगंगा प्रवाहित झाली. तेच महाराजांचे साहित्य होय. त्यांना साहित्याची शक्ती कळली होती. 'साहित्याचे सौंदर्य जगाला वाचवू शकते.' या डोस्टोव्हस्कीच्या विधानाची सार्थकता महाराजांच्या 'साहित्याची महान शक्ती जगातील मोठ्याा शक्तीपैकी एक आहे' या विधानाशी साधर्म्य साधणारी आहे. या साहित्यशक्तीचा उपयोग माझ्या समाजाला व्हावा, देशाच्या सर्वांगीण विकासासाठी ही शक्ती भक्तिभावाने वेचली जावी.... साहित्य हे समाजाला सामर्थ्य देऊन पुढे नेण्याचे माध्यम आहे. अशी त्यांची साहित्यविषयक धारणा होती. 'समाजातल्या वैषम्याच्या भिंती पाडणारे साहित्य व असे साहित्य निर्माण करणारे साहित्यिक मला अपेक्षित आहेत.' अशी भावना त्यांनी व्यक्त केली होती. ते म्हणतात, "साहित्य झब्बशूाहीसाठी, दीनदुबळयांच्या झोपड्याा चिरडण्यासाठी नाही. जगाला जगविण्यासाठी, जगाच्या निरीक्षणासाठी, जगाच्या विशालतेत विलीन होण्याचे शिक्षण घेण्यासाठी साहित्य आहे."[5] (श्री गुरूदेव 1956)

'साहित्यिकाचे कर्तव्य ' या संदर्भात महाराज म्हणतात की, 'प्रत्येक मानव माझा आहे. ही सहानुभूतीची भावना हृदयात जागृत होणे हे कवीचे पहिले लक्षण होय.' अशाच आत्मीय भावावस्थेतून, सह–अनुभूतीतून त्यांच्या मनात विश्वचैतन्याचा साक्षात्कार झालेला आहे. त्या साक्षात्कारामुळेच त्यांना जगातील प्रत्येक घटकांविषयी करुणा निर्माण झाली. म्हणूनच त्या प्रत्येक घटकांच्या भावभक्तीचा, तत्त्वविचाराचा विचार करून महाराजांनी मानवता धर्म व मानवतावादी विचाराचा पुरस्कार करणारे मंदिर व कोणत्याही जाती, धर्म, पंथ, पक्षाच्या व्यक्तीला आपली प्रार्थना मुक्तपणे करता येईल व आपल्या अंतरात्म्यातल्या ईश्वराला भजता येईल अशी ईश्वर कल्पना त्यांनी 'गुरूदेव' रूपातून मांडली. स्वतःचा कोणताही असा स्वतंत्र धर्म, पंथ, संप्रदाय निर्माण केला नाही अथवा कोणत्याही पंथ संप्रदायावर अधिकार सांगीतला नाही. ही त्यांची विश्वकरुणेतून निर्माण झालेली वैश्विक समत्वाची संकल्पना आहे. *'मानवता है पंथ मेरा। इन्सानियत है पक्ष मेरा /सब की भलाई धर्म मेरा। दुविधा को हटाना कर्म मेरा।।* अशा मानवतावादाची संकल्पना त्यांनी 'ईश्वर धर्म' याला अनुसरून करताना त्याला 'गुरूदेव' या संकल्पनेतून प्रकट केले. ज्या मुक्तमोकळ्या, नैतिक अधिष्ठानात्मक संकल्पनेत जगातले सर्व प्रवृत्ती प्रवाह आपली सेवाभक्ती साधू शकते. हा विश्वास महाराजांना होता व त्यामुळेच त्यांनी विश्वकुटुंबाची, विश्वधर्माची, मानवतेची संकल्पना मांडली, जी त्यांच्या साहित्याच्या केंद्रस्थानी आहे. माणूस हाच त्यांच्या साहित्याच्या केंद्रस्थानी आहे. त्या माणसाचे

संवर्धन आणि संरक्षण हेच त्यांच्या साहित्याचे प्रयोजन आहे. माणुसकीचे संवर्धन, उन्नयन होण्यासाठी मानवविकासाची काळजी वाहण्याचे कार्य साहित्यिकांकडून व्हावे ही त्यांची अपेक्षा होती. 'महाराजांनी साहित्यिकांवर सर्व धर्म नीती, संस्कृतीसंवर्धनाची जबाबदारी टाकली होती; असेही नव्हे तर साहित्यिकांकडून मनोरंजनाची ही अपेक्षा त्यांनी टाळली नाही. ते म्हणतात, "मनोरंजनापासून जगाला अलग करता येत नाही याची मला जाणीव आहे. पण ते मनोरंजन समाजाला विकृत बनविणारे साधन ठरू नये. हिरे, मोती, फुले तारका यातील सौंदर्यासोबतच दुःखितांचे अश्रू श्रमिकांचे धर्मबिंदू यांत असलेल्या सौंदर्याची चमक साहित्यिकांनी बघितली पाहिजे. समाजामध्ये सत्य, पवित्रता, सुंदरता यावी याकडे साहित्यकलेचे पर्यायाने साहित्यिकांचे लक्ष असावे."[6] असा विचार त्यांनी प्रकट केला तसेच त्यांनी विद्वानांचा वर्ग केवळ कौशल्यपूर्ण लेख लिहून भाषण करून एकीकडे वाङ्मयक्षेत्राच्या टोकांवर खेळ खेळत बसला आहे. आणि दुसरीकडे अशिक्षित समाजाला विविध मतांची विचित्र गुंतागुंत उकलून पुढे पाऊल टाकणे कठीण झाले आहे. अशा स्थितीत समाजाच्या या विस्कटलेल्या घडीचे संबंध परत जोडण्याकरिता एकतर साहित्याने मागे येऊन व्यवहाराला आपल्या परिने तरी वर न्यावे किंवा प्रगत करावे अथवा साहित्य हे खालच्या लोकांकरिता नाहीच असे सांगून तरी टाकावे अशाप्रकारची परखड भूमिका त्यांनी घेतली होती. निष्काम प्रेमाने दोन माणसे एकत्र आणून मानवविकास साधण्याचे कार्य कवींनी, साहित्यिकांनी आपल्या रचनासामर्थ्याने करावे ही महाराजांची वैश्विक कल्पदृष्टी होती. कलादृष्टी होती. *'मै तो शब्दोंकी खैरात हू। सब शब्द मेरे पास है। मुर्दे जगाँ दू शब्दोंसे होता अशुभ का न्हास है।* ही माणसातले मुर्देपण संपवणारी सर्व शब्दांची श्रीमंती महाराजांजवळ असल्याचा आत्मविश्वास होता. त्यांना निपचित पडलेल्या थंडगार मनांना विचाराची ऊर्जा देऊन, नवचेतनेने प्रेरीत करून नवा सामर्थ्यसंपन्न माणूस निर्माण करायचा होता. त्यासाठीच त्यांनी आपले सर्व आयुष्य, साहित्यसेवा, कवित्व जनजागरणात घालविलं. ही आपल्या संपूर्ण साहित्याला मानवताधिष्ठित अधिष्ठान देणारी वाङ्मयीनदृष्टी महाराजांची होती.

## संदर्भ सूची :

1.रघुनाथ कडवे, राष्ट्रसंत तुकडोजींचे व्यक्तिमत्त्व, अमोल प्रकाशन, नागपूर, 2013 पृ.30
2. तत्रैव पृ.32 (श्री गुरूदेव, ऑक्टोबर 1957 मधुन उधृत )
3. अक्षयकुमार काळे, प्रस्तावना, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजः व्यक्ती आणि वाङ्मय, विसा बुक्स नागपूर, 2008,पृ. 12
4. अ.ना. देशपांडे, हितबोध, श्रीगुरूदेव प्रकाशन, तिवसा, तृतीय आवृत्ती,2010 पृ.78
5. तत्रैव, पृ. 78 (श्री गुरूदेव मासिक, ऑक्टोबर 1956मधुन उधृत)
6. तत्रैव, पृ. 80 (श्री गुरूदेव मासिक, ऑक्टोबर 1954मधुन उधृत)